सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियान राबविणेबाबत.

**महाराष्ट्रशासन**
**जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: ५ डिसेंबर, २०१४

**वाचा -**

१) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्रमांक : मापदंड-२०१४/प्र.क्र. ११४/जल-७, दि. १० ऑक्टोबर,२०१३ व दि. १५ ऑगस्ट,२०१३.
२) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्रमांक : जलस-२०१२/प्र.क्र.७९/जल-७,दि. १२ नोव्हेंबर,२०१३.
३) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्रमांक : आदर्श -२००७/प्र.क्र. १२१/जल-७, दि. ३० नोव्हेंबर,२००७.
४) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय क्रमांक : मफुअ-२०१४/प्र.क्र.३०/जल-८, दि. ७ मार्च,२०१४.
५) महसूल व वन विभागाचा शासन निर्णय क्रमांक : एससीवाय-२०१४/प्र.क्र. २०१ /म-७, दि. १९ ऑगस्ट,२०१४ व दि. २५ ऑगस्ट, २०१४.

**प्रस्तावना -**

महाराष्ट्र राज्यात पिकाच्या ऐन वाढीच्या काळात पावसाची अनियमितता व पावसातील खंड यामुळे सतत टंचाई सदृश परिस्थिती निर्माण होऊन त्याचा मोठा परिणाम कृषि क्षेत्रावर होत आहे. राज्यातील सिंचनाच्या सुविधांचा विचार करता मर्यादित सिंचन सुविधा (जल व सिंचन आयोगाच्या अहवालानुसार संपुर्ण सिंचन क्षमता उपयोगात आणली तरी ४४% क्षेत्र कोरडवाहूच राहणार), अवर्षण प्रवण क्षेत्राची मोठी व्याप्ती (१५९ लक्ष हेक्टर म्हणजेच लागवड योग्य क्षेत्राच्या ५२ % क्षेत्र) हलक्या व अवनत जमिनीचे मोठे प्रमाण (४२.२०%) विषम, अनिश्चित व खंडीत पर्जन्यमान यामुळे कृषि क्षेत्रात वाढत जाणारी अनिश्चितता या बाबी प्रकर्षाने राज्याच्या विकासामध्ये आव्हान ठरत आहेत. राज्यात मागील चार दशकात कोरडवाहू क्षेत्रातील पिकांच्या उत्पादनामध्ये मोठया प्रमाणात चढ उतार दिसून येत आहे. या परिस्थितीस मुख्यत्वेकरुन पाण्याची कमी उपलब्धता हा घटक कारणीभूत आहे. शाश्वत शेतीसाठी पाणी व पिण्याच्या पाण्याची उपलब्धतता करुन देण्यासाठी जलसंधारणांतर्गत उपाययोजना

एकात्मिक पध्दतीने सर्व विभागाच्या समन्वयाने नियोजनबद्ध आराखडा तयार करुन राबविल्यास पिण्याचे पाणी व पिकास संरक्षित सिंचन देण्याची व्यवस्था निश्चितपणे करता येईल.

सन २०१४ मध्ये पर्जन्यमानात सरासरी २०% पेक्षा जास्त घट असलेले १८४ तालुके आहेत तर भूजलपातळीत ३ मीटर पेक्षा जास्त घट झालेले ७२ तालुके, २ ते ३ मीटरपेक्षा जास्त घट झालेले ११६ व १ ते २ मीटरपेक्षा जास्त घट झालेले १९० तालुके आहेत. म्हणजेच भूगार्भातील पाणी पातळीत २ मीटरपेक्षा जास्त घट झालेले १८८ तालुके (२२३४ गावे) आहेत. या गावांत पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई भासण्याची शक्यता आहे. शासनाने दि. २५ नोव्हेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये २२ जिल्हयांतील १९०५९ गावांमध्ये टंचाई सदृश परिस्थिती जाहिर केलेली आहे. तसेच राज्यातील मोठया प्रकल्पात सरासरी ८१ % मध्यमप्रकल्पात सरासरी ६७ % व लघू प्रकल्पात सरासरी ६० % पाणी साठा उपलब्ध आहे. हि वस्तुस्थिती पाहता राज्यातील २२ जिल्हयांमधील काही तालुक्यातटंचाईसदृशपरिस्थितीनिर्माण झाली आहे.सन २०११-१२ मध्ये पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यात तीव्र टंचाई परिस्थिती निर्माण झाली होती. राज्यात दर २ वर्षानंतर काही भागात टंचाई परिस्थिती निर्माण होते असे निदर्शनास येत आहे.

राज्यात मागिल दोन वर्षात साखळी सिमेंट कॉंक्रीट नाला बांध कार्यक्रम, महात्मा फुले जल व भूमी संधारण अभियान राबविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे लातूर जिल्हयात गाळ काढणे, नांदेड जिल्हयात विहिर पुनर्भरण ही पाणी अडविणे व जिरविणे (Water Harvesting)ची कामे यशस्वीपणे राबविण्यात आली आहेत. सन २०१२-१३ मध्ये टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी पुणे विभागातील ५ जिल्हयात जलयुक्त गाव अभियान हा उपक्रमराबविण्यात आला. त्यामध्ये सर्व विभागाच्या समन्वयातून एकत्रितपणे वेगवेगळया योजना राबवून पाणी अडविण्यासाठी व भूजल पातळीत वाढ करण्यासाठी कृती आराखडा तयार करण्यात आला. या अभियानात जलसंधारणाच्या माध्यमातून विभागात पाणलोटाची कामे, सिमेंट साखळी नाला बांधकामे, जुने अस्तित्वातील सिमेंट नालाबांध / के.टी.वेअर दुरुस्ती व नुतनीकरण, जलस्तोत्रातील गाळ काढणे, जलस्तोत्र बळकटीकरण, विहीर पुनर्भरण, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर आणि ओढे/नाले जोड कामे हाती घेणेत आली. या सर्व कामांच्या माध्यमातून ८.४० टीएमसी क्षमतेचे विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करण्यात आले आहेत. त्यामुळे भूजल पातळीत १ ते ३ मीटरने वाढ झाली असून पिण्याचे पाणी व शेतीसाठी संरक्षित सिंचनाची सोय झाली. त्यामुळे टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यास मदत झाली आहे.

या सर्व कार्यक्रमांची फलश्रुती विचारात घेता “सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९”करण्यासाठी व टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी एकात्मिक पध्दतीने नियोजनबद्धरित्या कृती आराखडा तयार करुन पाण्याची उपलब्धता वाढविण्यासाठी “जलयुक्त शिवार अभियान” राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय-

राज्यात जवळ जवळ ८२% क्षेत्र कोरडवाहू व ५२% क्षेत्र अवर्षण प्रवण आहे. सन २०१४-१५ मध्ये भूजल पातळीत २ मीटरपेक्षा जास्त घट झालेले १८८ तालुके (२२३४ गावे) आहेत तर २२ जिल्हयांतील १९०५९ गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहिर केली आहे. त्या ठिकाणी प्राधान्याने सदर "जलयुक्त शिवार अभियान" राबविणे आवश्यक आहे. तसेच भविष्यात राज्यातील उर्वरित भागात पाणी टंचाई परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्याकरिता विविध विभागांतर्गत मंजूर असलेल्या योजनांच्या मंजूर निधीतून/Convergence करुन MREGS/आमदार/खासदार निधी/ जिल्हास्तर निधी/ अशासकीय संस्था /CSR लोकसहभाग यांच्या माध्यमातून टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हयात जलयुक्त शिवार अभियान राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**१) अभियानाचा उद्देश :-**

राज्यात सतत उद्भवणारी टंचाई सदृश परिस्थिती विचारात घेऊन "सर्वांसाठी पाणी -टंचाई मुक्त महाराष्ट्र २०१९" अंतर्गत जलयुक्त शिवार अभियान हाती घेण्यात येत आहे :-

१. पावसाचे जास्तीत जास्त पाणी गावाचे शिवारातच अडविणे.
२. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ करणे.
३. राज्याच्या सिंचन क्षेत्रात वाढ करणे-शेती साठी संरक्षित पाणी व पाण्याच्या वापराच्या कार्यक्षमतेत वाढ करणे.
४. राज्यातील सर्वांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करण्याची शाश्वता - ग्रामीण भागातील बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे पुनर्जिवीकरण करुन पाणी पुरवठ्यात वाढ करणे.
५. भूजल अधिनियम अंमलबजावणी.
६. विकेंद्रीत पाणी साठे निर्माण करणे.
७. पाणी साठवण क्षमता निर्माण करणारी नविन कामे हाती घेणे.
८. अस्तित्वात असलेले व निकामी झालेल्या जलस्तोत्रांची (बंधारे / गाव तलाव / पाझरतलाव / सिमेंट बंधारे) पाणी साठवण क्षमता पुन:र्स्थापित करणे / वाढविणे.
९. अस्तित्वातील जलस्त्रोतांमधील गाळ लोक सहभागातून काढून जलस्त्रोतांचा पाणीसाठावाढविणे.
१०.वृक्ष लागवडीस प्रोत्साहन देऊन वृक्ष लागवड करणे.
११.पाण्याच्या ताळेबंदाबाबत जनतेत जाणीव /जागृती निर्माण करणे.
१२.शेतीसाठी पाण्याचा कार्यक्षम वापर करणेस प्रोत्साहन / जनजागृती करणे.
१३.पाणी अडविणे / जिरविणे बाबत लोकांना प्रोत्साहित (Sensitize)करणे/ लोकसहभाग वाढविणे.

२. **अभियानाची व्याप्ती :-**

सदर कार्यक्रम अभियानस्वरुपात शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, लोकसहभाग व खाजगी उदयोजक (CSR) यांच्याकडील उपलब्ध निधीतून राज्यातील टंचाई सदृश तालुक्यात व उर्वरित भागात भविष्यात टंचाई भासू नये यासाठी राबविण्यात यावा.

३. **विभागीय समन्वय समिती :**

या अभियानासंदर्भात संबंधित यंत्रणांचा परिणामकारक समन्वय साधणे, आराखडयास मान्यता देणे, सनियंत्रण व शासनास अहवाल सादर करण्याकरिता विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे. :-

| | | |
|---|---|---|
| विभागीय आयुक्त | : | अध्यक्ष |
| विभागीय कृषि सहसंचालक | : | सदस्य |
| अधिक्षक अभियंता, लघु सिचंन (जलसंधारण) मंडळ | : | सदस्य |
| अधिक्षक अभियंता, जलसंपदा | : | सदस्य |
| उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास | : | सदस्य |
| यंत्रणाउप आयुक्त (विकास) | : | सदस्य |
| उप आयुक्त (रोहयो) | : | सदस्य सचिव |

४. **जिल्हास्तरीय समिती :-**

या अभियानासंदर्भात अंमलबजावणीबाबत निर्णय घेणे / गावांची / कामांची निवड करणे / त्यांना मान्यता देणे / कृती आराखडा तयार करणे / कार्यक्रमाची अंमलबजावणी / सनियत्रण व समन्वय करण्यासाठी जिल्हा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे. :-

| | | |
|---|---|---|
| जिल्हाधिकारी | : | अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | : | सह अध्यक्ष |
| अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | : | सदस्य |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद | : | सदस्य |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मनरेगा) | : | सदस्य |
| उप जिल्हाधिकारी (रोहयो) | : | सदस्य |
| कार्यकारी अभियंता (ग्रामिण पाणी पुरवठा) | : | सदस्य |
| जिल्हा परिषद वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा | : | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग | : | सदस्य |
| कार्यकारी अभियंता, लघु सिंचन विभाग | : | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| जिल्हा परिषद कार्यकारी अभियंता, लघु सिंचन | : | सदस्य |
| जलसंधारण विभाग उप विभागीय अधिकारी (प्रांत) | : | सदस्य |
| तज्ञ व्यक्ती (जलसंधारण)- (१) | : | सदस्य |
| अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी-(२) | : | सदस्य |
| जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | : | सदस्य सचिव |

**५. तालुकास्तरीय समिती :-**

या अभियानासंदर्भात तालुकास्तरीय आराखडा सर्व यंत्रणेच्या समन्वयाने तयार करुन जिल्हास्तरीय समितीला सादर करतील.या करीता तालुकास्तरावर खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| उपविभागीय अधिकारी (प्रांत) | : | अध्यक्ष |
| गट विकास अधिकारी | : | सह सदस्य |
| उपविभागीय कृषी अधिकारी | : | सदस्य |
| तहसिलदार | : | सदस्य |
| उप अभियंता (पाणी पुरवठा) | : | सदस्य |
| गट विकास अधिकारी | : | सदस्य |
| उप अभियंता जलसंपदा | : | सदस्य |
| उप अभियंता लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ | : | सदस्य |
| उप अभियंता (सिंचन) जिल्हा परिषद | : | सदस्य |
| तज्ञ व्यक्ती (जलसंधारण) | : | सदस्य |
| अशासकीय संस्थाचे प्रतिनिधी | : | सदस्य |
| तालुका कृषी अधिकारी | : | सदस्य सचिव |

**६. अभियानांतर्गत हाती घ्यावयाची कामे :-**

जलयुक्त शिवार अभियानात खालील कामे घ्यावीत याबाबतचा सविस्तर तपशील परिशिष्ट ब प्रमाणे आहे.

१) पाणलोट विकासाची कामे.
२) साखळी सिमेंट कॉंक्रीट नाला बंधाऱ्यांची कामे नाला खोलीकरण / रुंदीकरणासह करणे.
३) जुन्या जलसंरचनांचे पुनर्जिवन करणे.
४) अस्तित्वातील लघु पाटबंधारे संरचनांची (केटी वेअर / साठवण बंधारा) दुरुस्ती करणे.
५) पाझर तलाव, लघू सिंचन तलाव दुरुस्ती, नुतनीकरण व क्षमता पुर्नस्थापित करणे (RRR).
६) पाझर तलाव / गाव तलाव / साठवण तलाव / शिवकालीन तलाव / ब्रिटीशकालीन तलाव / निजामकालीन तलाव / माती नालाबांधातील गाळ काढणे.
७) मध्यम व मोठया प्रकल्पांची सिंचन क्षमतेनुसार प्रत्यक्ष वापर होण्यासाठी उपाय योजना करणे.

८) छोटे ओढे/नाले जोड प्रकल्प राबविणे.
९) विहीर / बोअरवेल पुनर्भरण कामे.
१०) उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर.
११) पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे.
१२) पाणी वापर संस्था बळकट करणे.
१३) कालवा दुरुस्त करणे.

सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ उपक्रमांतर्गत राबवावयाच्या उपाययोजनांसाठी डिलिव्हरींग चेंज फाऊंडेशन (डीसीएफ) आणि पेमांडू यांच्याद्वारे १९ ते २७ जून, २०१४ दरम्यान आयोजित "सर्वांसाठी पाणी-वॉटर लॅब" मध्से सर्व घटकांच्या सहभागातून आणि सहमतिद्वारेविकसित झालेल्या प्राधान्य क्रमांचा, निकषांचा अवलंब केला जाईल.

**७. अभियानाचा कालावधी :-**

अभियानांतर्गत नियोजित कामे पावसाळयापुर्वी पूर्ण होतील अशी कार्यवाही करणे आवश्यक असल्याने डिसेंबर अखेर कृती आराखडा तयार करण्यात यावा. त्यास विभागीय समितीची मान्यता घेवून जानेवारी च्या पहिल्या आठवडयात प्रत्येक तालुक्यातून किमान ५ कामे सुरु करावीत.या कार्यक्रमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी जानेवारी २०१५ ते जानेवारी २०१६ पर्यंत करण्यात यावी व त्यानंतर जानेवारी २०१६ ते मार्च २०१६ या कालावधीत मुल्यमापनाचे काम करण्यात यावे.याप्रमाणे सन २०१९ पर्यंत सदर अभियानाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**८. ज्या गावात तीव्र पाणी टंचाई आहे अशा गावात पाण्याच्या ताळेबंदानुसार पाण्याची गरज लक्षात घेवून कार्यक्रम राबवावा.सदरचे अभियान हे गाव व तालुका घटक म्हणून राबविण्यात यावे.**

**९. साखळी सिमेंट काँक्रीट नाला बांध घेण्याकरिता गावनिवडीचे निकष (शासन निर्णय क्र.जलस२०१२/प्र.क्र.७९/जल-७, दिनांक १२/११/२०१३)**

जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत साखळी सिमेंट काँक्रीट नाला बांध कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनानुसार साखळी सिमेंट बंधारे घेण्यासाठी गावाची निवड करावी. एकात्मिकपाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत पाण्याचा ताळेबंद निश्चित करुन त्याठिकाणी आवश्यकतेनुसार साखळी सिमेंट नाला बांध कार्यक्रम देखील प्राधान्याने घेण्यात यावा.या संदर्भात भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा यांचे अभिप्राय न चूकता घेण्यात यावेत.

**१०.निधीची उपलब्धता :-**

राज्यामध्ये जलयुक्त शिवार अभियान राबविणेसाठी विविध योजनांतर्गत उपलब्ध असलेल्या निधीचा वापर करण्यात यावा. अभियानासाठी वेगवेगळया योजनेच्या लेखाशिर्षांतर्गत जिल्हास्तरावर उपलब्ध होणाऱ्या निधीची एकत्रितपणे सांगड घालून (Convergence) नियोजित

कामे पूर्ण करण्यात यावीत. त्याचप्रमाणे अभियानांतर्गत नियोजित कामे पूर्ण करण्यासाठी लोकसहभाग घेण्यात यावा.

**वेगवेगळया स्तोत्रातून उपलब्ध होऊ शकणारा निधी**

| अ. क्र. | कामाचा तपशील | निधी उपलब्ध होऊ शकणाऱ्या योजना | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | पाणलोट विकासाची कामे- कंपार्टमेंट बंडींग / ढाळीची बांधबंदिस्ती, शेततळे, मातीचा नालाबांध, सलगसमतल चर इत्यादी | IWMP, मनरेगा, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान, राज्यस्तर निधी, आदिवासी उपयोजना / बिगर आदिवासी उपयोजना, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, विशेष घटक योजना | कृषि, वन व सामाजिक वनीकरण |
| २ | साखळी सिमेंट कॉंक्रीट नाला बांध/नाला खोलीकरण/सरळीकरण/ रुंदीकरण करणे | मा. मुख्यमंत्री सहाय्यता निधी, राज्यस्तर निधी, जिल्हा नियोजन समिती निधी, मा. खासदार / आमदार निधी, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम, जिल्हा परिषदेस निधी, अशासकीय संस्था निधी, सहकारी साखरकारखाने CSR व इतर संस्था निधी | कृषि, लघु सिंचन (जलसंधारण), जलसंपदा जिल्हा परिषद. |
| ३ | जुन्या जलसंरचनांचे पुनर्जिवन करणे | मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधी, राज्यस्तर निधी, जिल्हानियोजन समिती निधी, जिल्हा परिषदेस निधी, अशासकीय संस्था निधी, सहकारी साखर कारखाने, CSR, लोक सहभाग, यांत्रिकी विभागाकडील उपलब्ध मशिनरी, महात्मा फुले जल भुमी अभियान निधी, मनरेगा, IWMP- प्रेरक प्रवेश उपक्रम निधी | कृषि, लघु सिंचन (जलसंधारण), जलसंपदा जिल्हा परिषद |
| ४ | अस्तित्वातील मृद व जलसंधारण प्रकारच्या संरचनांची, के टी वेअर साठवण बंधारा यांचीउपयोगितावाढविणे व दुरुस्ती | राज्यस्तर निधी, जिल्हा नियोजन समिती निधी, जिल्हा परिषदेस निधी, अशासकीय संस्था निधी, सहकारी साखर कारखाने, लोक सहभाग | कृषि, लघु सिंचन (जलसंधारण), जिल्हा परिषद व जलसंपदा विभाग |

| अ. क्र. | कामाचा तपशील | निधी उपलब्ध होऊ शकणाऱ्या योजना | अंमलबजावणी यंत्रणा |
|---|---|---|---|
| ५ | मोठया व मध्यम प्रकल्पांची उपयोगिता वाढविणे | राज्य स्तरनिधी, जिल्हा नियोजन समिती निधी, अशासकीय संस्था निधी, सहकारी साखर कारखाने, लोक सहभाग | जलसंपदा |
| ६ | छोटे नदी/नाले जोड प्रकल्प | राज्य निधी | जलसंपदा |
| ७ | ल.पा.तलाव/मा.मा.तलाव/पाझरतलाव/गावतलाव/साठवणतलाव/शिवकालीनतलाव/ब्रिटीशकालीनतलाव/निजामकालीनतलाव/मातीनालाबांधातील गाळकाढणे. | मनरेगा, लोकसहभाग, सहकारी साखर कारखाने, अशासकीय संस्था, महात्मा फुले जल व भुमी अभियान, विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रम | कृषि, लघु सिंचन (जलसंधारण), जिल्हा परिषद व जलसंपदा |
| ८ | पिण्याचे पाणी स्तोत्र बळकटीकरण करणे. | जिल्हा परिषद निधी, जिल्हा नियोजन समिती निधी, | पाणीपुरवठा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, जिल्हा परिषद |
| ९ | विहीर/बोअरवेलपुनर्भरणकामे | मनरेगा, महात्मा फुले जल भुमी अभियान निधी | कृषि, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद |
| १० | उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर, पीक पद्धतीत बदल | राष्ट्रीय सुक्ष्म सिंचन अभियान, राज्यनिधी | कृषि व जलसंपदा |
| ११ | कोरडवाहू शेती अभियान अंमलबजावणी (विस्तृत टिपणी परिशिष्ट फ) | राज्य निधी | कृषि |
| १२ | पाणी वापर संस्था बळकटीकरण | राज्य निधी लोक सहभाग | जलसंपदा व जलसंधारण |
| १३ | कालवा स्वच्छता | मनरेगा | जलसंपदा व जलसंधारण |
| १४ | जनजागृती | IWMP महात्मा फुले जलभूमी अभियान | कृषि |
| १५ | प्रसिद्धी | IWMP महात्मा फुले जलभूमी अभियान | कृषि |

**११.महात्मा फुले जल व भूमी अभियान :-**

शासनाने या अभियानासाठी यावर्षी रु. २५.०० कोटी निधी उपलब्ध करुन दिला आहे. सदर निधाचा जलस्त्रोत बळकट करण्याच्या कामासाठी करण्यात यावा. टंचाई जाहिर झालेल्या / आदिवासी आणि डोंगरी विकासामध्ये समाविष्ठ असलेल्या गावांच्या कामासाठी व संबंधीत जिल्हा अधिकारी व विभागीय आयुक्त यांची मागणी आल्यानंतर अधिकचा निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

**१२.गावासाठीपाण्याचा ताळेबंद तयार करणे :-**

जलयुक्त शिवार अभियान तंत्र शुध्दरित्या राबविण्याकरिता संबंधीत गावातील पाण्याचा ताळेबंद तयार करणे आवश्यक आहे. सदर ताळेबंद कृषि/जलसंधारण/जलसंपदा/भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा यांनी तयार करावा.त्याबाबतची कार्यपध्दती **परिशिष्ट ड** प्रमाणे अंवलंबवावी.

**१३.अभियानाचा आराखडा तयार करणे:-**

जलयुक्त शिवार अभियान राबविणेसाठी जिल्हा निहाय आराखडा तयार करणे आवश्यक आहे. सदरचा आराखडा तयार करताना शासनाच्या विविध योजनांतर्गत उपलब्ध होणारा निधी, मनरेगा निधी, स्वंयसेवी संस्थाचा सहभाग, CSR, सहकारी संस्था आणि लोक सहभाग यांचा विचार करणेत यावा. अभियानांतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा आराखडा तयार करताना जिल्हयामध्ये १) अस्तित्वात असलेली जलसंधारणाची कामे प्राधान्याने पूर्ण करणे २) नव्याने हाती घ्यावयाची कामे, ३) अस्तित्वात असलेल्या कामांची दुरुस्ती आणि जलस्तोत्रातील गाळ काढणे या कामांचे उद्दिष्ट व त्यासाठी आवश्यक निधी हे निश्चित करावे. गाव / तालुका / जिल्हा यांचा आराखडा तयार करण्याबाबतचा नमुना **परिशिष्ट क** मध्ये दिला आहे. त्यानुसार आराखडे तयार करावेत.

गाव पातळीवरील आराखडा करणेसाठी संबंधीत विभागाचे अधिकारी उदा. ग्रामसेवक / तलाठी / कृषि पर्यवेक्षक / कृषि सहायक / शाखा अभियंता / कनिष्ठ अभियंता यांनी शिवार भेट करुन केंद्राभिमुख आराखडा तयार करण्यासाठी मदत करावी. सदरचा आराखडा तयार करण्यासाठी विस्तार अधिकारी (कृषि) / मंडळ कृषि अधिकारी/ मंडळ अधिकारी (महसुल) यांनी नेमणूक जिल्हाधिकारी यांनी करुन त्यांनी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, प्रगतशिल शेतकरी यांच्यासोबत शिवार भेट करुन गावाच्या गरजा विचारात घेऊन गाव आराखडा तयार करावा. हा गाव आराखडा ग्रामसभेत मंजूर करावा. तालुक्यातील व जिल्हयातील गावांचे आराखडे एकात्रित करुन तालुका व जिल्हा आराखडा तयार करावा. जलयुक्त शिवार अभियान आराखडा तयार करताना जिल्हास्तरीय सर्व संबंधित यंत्रणांचा सहभाग आवश्यक राहील.

**१४.**नाविन्यपूर्ण योजनांकरिता जिल्हा नियोजन विकास समिती यांचेकडे उपलब्ध असलेला ३.५% निधी त्याचप्रमाणे राज्य व जिल्हा स्तरावर उपलब्ध असलेला मदत व पुनर्वसन निधीचा वापर प्राधान्याने **जलयुक्त शिवार अभियान** या कार्यक्रमास वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे. यामधून जेसीबी यंत्राचा वापर करुन न्याल्यातील गाळ काढणे, नाला खोलीकरण/रुंदीकरण करणे इत्यादी कामे घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना देण्यात येऊन या निधीमधून करण्यात येणाऱ्या कामांना

प्रशासकीय मंजूरी देण्यास जिल्हा स्तरीय समिती सक्षम असेल. स्थनिक स्वराज्य संस्थेकडील निधीची मान्यता देण्याचे अधिकार त्या त्या संस्थेतील प्राधिकरणास असतील.

**१५.सीएसआर /अशासकीय संस्था / लोकसहभाग कक्ष**

याकरिता जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांनी जिल्हा/तालुका पातळीवरील संबंधित अधिकाऱ्यांची एक समिती नियुक्त करावी. जलसंधारण कामे सी.एस.आर मधून करणेसाठी प्रकल्प तयार करावे. तसेच मंत्रालयीन स्तरावर पाणी क्षेत्राशी संबंधित विभागाचे अधिकारी डिलीव्हरींग चेंज फाऊंडेशन चे प्रतिनिधी, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रतिनिधी यांची समिती नियुक्त करण्यात यावी. तसेच धोरणात्म बाबींकरीता मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रतिनिधी , संबंधित विभागाचे सचिव, डिलीव्हरींग चेंज फाऊंडेशन चे प्रतिनिधी, विषयतज्ञ यांची समिती नियुक्त करण्यात यावी. याबाबतच्या मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

**१६.तांत्रिक व प्रशासकीय मान्यता :-**

गावाच्या आराखड्यास ग्राम सभेची मान्यता मिळाल्यानंतर या कार्यक्रमांतर्गत समाविष्ट करण्यात आलेल्या संबंधित योजनांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तांत्रिक व प्रशासकीय मान्यता संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून घ्याव्यात.

**१७.स्वामित्व कर (Royalty) :-**

अस्तित्वात असलेल्या जलस्त्रोतातील गाळ हा करमुक्त असेल. (महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. गौखनि-१०९२/प्र.क्र.५२/ख, दि. १९ मार्च,१९९९ व गौखनि-१०/०५१०/ प्र.क्र.२१५/ख, दिनांक ०३ नोव्हेंबर, २०१०)

**१८.अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी नोडल अधिकारी :-**

जलयुक्त शिवार अभियानाचा आराखडा तयार करणे, प्रभावी अमंलबजावणी, समन्वय व संनियंत्रणासाठी उप विभागीय अधिकारी (प्रांत) हे तालुका स्तरावर व जिल्हाधिकारी हे जिल्हा स्तरावर नोडल अधिकारी म्हणून काम पाहतील.

**१९. उत्कृष्ठ कार्याकरिता पारितोषिक :-**

या अभियांनांतर्गत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या तालुक्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे. याकरिता प्रत्येक जिल्ह्यातील अभियांनांतर्गतउत्कृष्ठ कार्य केलेल्या दोन तालुक्यांची निवड करण्यात यावी. त्याचप्रमाणे विभागीय स्तरावर पारितोषिकाकरिता दोन तालुक्यांची निवड करण्यात यावी व राज्य स्तरावर पारितोषिकाकरिता तीन तालुक्यांची निवड करण्यात यावी. पारितोषिकाबाबतचे निकष स्वतंत्रपणे ठरविण्यात येतील.

**२०. अभियानाची जन जागृती :-**

राज्यात जलयुक्त शिवार अभियानाची अंमलबजावणी परिणामकारक होणेसाठी जनजागृती कार्यक्रम हाती घेणेत यावा. अभियान जन जागृती कार्यक्रमामध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित राहील. यासाठी विविध योजनांच्या जनजागृती/प्रसिद्धीसाठी असलेल्या उपलब्ध असलेल्या महात्मा फुले जल भूमि अभियान अंतर्गत

काही प्रमाणात निधी (सुमारे रुपये १० लक्ष प्रति जिल्हा) उपलब्ध करुन देण्यात यावा व याकरिता सर्व संबंधितांनी अभियानाच्या प्रसिद्धीचा आराखडा तयार करावा.

- गावातील लोकांना अभियाना बाबत माहिती देणे करिता, गावाचा आराखडा अंतिम करण्यासाठी ग्राम सभा आयोजित करावी.
- अभियानांतर्गत हाती घ्यावयाच्या कामासंदर्भात गावा मध्ये घोषवाक्य लिहीणे.
- गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, लोक प्रतिनिधी, महिलामंडळ प्रतिनिधी, तरुण मंडळ प्रतिनिधी आणि स्वयंसहायता गट प्रतिनिधी यांचेसाठी आदर्शगावांचा अभ्यास दौरा आयोजित करावा.
- अभियान संदर्भात पथनाटय / भजन / कीर्तन करण्यासाठी कीर्तनकार, भजनी मंडळयांना सामवून घ्यावे.
- जलयुक्त गावसंदर्भात विद्यार्थ्यांसाठी प्रभातफेरी / अभियानदौड / निबंधस्पर्धा / चित्रकलास्पर्धा / वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन गावामध्ये करणे.
- आकाशवाणी / दूरचित्रवाणी / खाजगी वाहिन्या यांचे मार्फत जनजागृती कार्यक्रम करणे.
- छापील पत्रक / घडी पत्रिका / पुस्तिका तयार करुन त्याचे वाटप करणे.
- सोशल नेटवर्कींग जसे फेसबुक / व्हॉट्सअपचा वापर करणे.
- आकाशवाणी / एफ. एम. रेडिओ द्वारे जिंगल्स / स्पॉटद्वारे प्रसिध्दी करणे.
- तालुका व जिल्हा पातळीवर लोकप्रतिनधी समवेत कार्यशाळा घेणे.
- प्रसिध्दी माध्यमांचा प्रभावी वापर करणे (प्रेस, दूरचित्र वाहिनी)

**२१. उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या पत्रकारांसाठी पारितोषिक :-**

प्रस्तुत **जलयुक्त शिवार अभियान** बाबत जनजागृती/अभियानामध्ये लोकसहभाग वाढविण्याकरिता जास्तीत जास्त लोकांना प्रोत्साहीत करणे/या कार्यक्रमाची सर्व जनतेस माहिती करुन देणे/अमंलबजावणी चे समिक्षण करणे इत्यादी बाबत उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या पत्रकारांना पारितोषिक देण्याबाबत योजना राबविण्यात यावी. याबाबत जिल्हा स्तरावर/विभागीय स्तरावर व राज्य स्तरावर प्रत्येकी तीन पारितोषिके देण्यात यावीत. या पुरस्काराबाबतच्या मागदर्शक सूचना/आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

**२२. अभियानाची फलनिष्पत्ती :-**

**जलयुक्त शिवार अभियानाची** फलनिष्पती निश्चित करताना कामापूर्वीची व कामानंतरची परिस्थिती, पाणीसाठा व कामाचे GIS Based डीजीटल फोटोग्राफस(अक्षांश व रेखांश सह) इ. माहिती संकलित करावीव ही माहिती संकेतस्थळावर उपलब्ध (Upload) करुन देण्यात यावी. या अभियानाच्या माहितीसाठी ग्राम विकास व जलसंधारणाच्या संकेतस्थळावर स्वतंत्र लिंक देवून

संकेतस्थळावरती या अभियानाची माहिती Online उपलब्ध करुन देण्यासाठी सुविधा निर्माण करण्यात येईल. तसेच खालीलबाबी विचारात घेवून Documentation करावे.

- गावात पिण्याच्या पाण्याची उपलब्धता वाढविणे. (स.घ.मी. पाणी क्षमतेत झालेली वाढ)
- भुगर्भातील पाणी पातळीत वाढ होणे.
- सिंचनक्षेत्रात वाढ होणे.
- पीक घनतेमध्ये वाढ होणे.
- कोरडवाहू पिकांखालील क्षेत्र कमी होऊन बागायती पिकाखालील क्षेत्र वाढणे.
- फलोत्पादन पिकाखालील क्षेत्रात वाढ
- कृषि उत्पादकता / उत्पादन गुणवत्तेमध्ये वाढ.
- मुल्यवर्धित वाढ
- चारा पिकाखालील क्षेत्रात वाढ होणे.
- जमिनीतील ओलावा सुरक्षेत वाढ.
- पर्यावरण सुधारणा (वृक्षसंवर्धन / लागवड)
- सामाजिक व आर्थिक जीवनमान उंचावणे.
- लोक सहभाग

**२३. सनियंत्रण व प्रगती अहवाल :-**

**अ) जिल्हास्तरीय समिती**

- टंचाईमुक्त महाराष्ट्र उपक्रमाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी हे नोडल अधिकारी असतील. या समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे राहील
- उपक्रमा संदर्भातील अंमलबजावणीबाबतची सर्व माहिती, आकडेवाडी निश्चित केलेल्या मापदंडात, निकषांनुसार संकलीत करणे.
- जिल्हा पातळीवर उपाययोजनांची अंमलबजावणीबाबत नियमितपणे आढावा घेणे.
- जिल्ह्यातील अंमलबजावणीचा अहवाल नियमितपणे विभागीय आयुक्तांना सादर करणे. तसेच अंमलबजावणीतील अडथळे, आव्हाने याबाबतचा अहवालही विभागीय समितीस सादर करणे.
- जिल्हा पातळीवर जनजागृती करणे, लोकसहभाग वाढविणे, चांगली कामगिरी करणाऱ्यांना पुरस्कारात्मक प्रोत्साहन देणे तसेच कालबद्ध, आराखड्यानुसार अंमलबजावणी न करणाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई करणे.
- जलयुक्त शिवार अभियानाचे प्रत्येक टप्प्यावर नियमितपणे संनियंत्रण ठेवणे. जलयुक्त शिवार अभियानांतर्गतजिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारीअधिकारी यांनी संयुक्तपणे जिल्हा स्तरावरील संबंधित यंत्रणांचा झालेल्या कामाचा आढावा प्रत्येक महिन्यात

घेणेत यावा व संबंधित यंत्रणांना आवश्यकतेनुसार मागदर्शन करावे. अभियांनांतर्गत झालेल्या कामाचा बाब निहाय अहवाल विभागीय आयुक्त यांना प्रत्येक महिन्याच्या ५ तारखे पर्यंत ऑनलाईन (Online) पाठविण्यात यावा.

**ब) विभागीय समिती**

- टंचाईमुक्त महाराष्ट्र उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी विभागीय आयुक्त हे विभाग स्तरावर नोडल अधिकारी असतील. ही समिती या आराखड्याच्या अंमलबजावणीबाबतचे सर्व अहवाल जिल्हा समितीकडून संकलित करेल आणि आढावा घेईल.
- समिती सदर अहवाल त्यांच्या अभिप्रायासह व आवश्यकतेनुसार अंमलबजावणीतील अडथळे, आव्हाने याबाबत अभिप्रायासह अहवालजलसंधारण विभागातील कक्षास सादर करेल.

**क) समन्वयन / संनियंत्रण कक्ष**

- या अभियानाचे पुढील पाच वर्षात Online Monitoring करण्यासाठी विभागाकडून interactive संकेतस्थळ विकसित करण्यात येईल. मंत्रालयातील जलसंधारण विभागात समन्वयन व संनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येईल या कक्षाद्वारे विभागीय आयुक्त यांचेकडून प्राप्त अहवाल छाननी केल्यानंतर इतर संबंधित विभागाचे त्यांचेशी संबंधित मुद्यावर अभिप्राय घेण्याची कार्यवाही करण्यात येईल व अहवाल सर्व संबंधित विभागाच्या अभिप्रायासह मा. मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयातील कक्षास सादर करण्यात येईल.

**ड) मुख्यमंत्री ट्रान्सफॉर्मेशन ऑफिस (सीएमटीओ)**

- मुख्यमंत्र्यांनी प्राधान्याने निश्चित केलेल्या क्षेत्रांच्या कालबद्ध व सर्वंकष विकासाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयांतर्गत मुख्यमंत्री ट्रान्सफॉर्मेशन ऑफिस (सीएमटीओ) कार्यरत राहील.
- या कार्यालयाचे कामकाज मुख्यमंत्री कार्यालयाद्वारे जलसंधारण विभाग आणि डिलिव्हरिंग चेंज फाऊंडेशन (डीसीएफ) च्या सहकार्यानेआणि पेमांडू (परफॉर्मन्स एन्हान्समेंट अँड मॅनेजमेंट डिलीव्हरी युनिट, मलेशिया पंतप्रधान कार्यालयांतर्गत स्वतंत्र विभाग) च्या समन्वयाने चालविले जाईल.
- निश्चित केलेल्या क्षेत्राच्या विकास आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी, राज्य, विभागीय, जिल्हा, तालुका तसेच गाव पातळीवरील मुल्यांकन निकष निश्चित (Key Performance Indicator) करणे आणि या निकषांच्या आधारे प्रत्येक टप्प्यावर अंमलबजावणीचे मूल्यांकन करण्यासाठी परिक्षण आणि मूल्यांकन साधन (मॉनिटरिंग अँड ट्रॅकिंग टुल) विकसित करण्याची जबाबदारी या कार्यालयाकडे राहील. तसेच

प्रत्येक निकष व मूल्यांकन साधनानुसार प्रत्येक पातळीवर अंमलबजावणी प्रक्रियेचे मूल्यांकन होते की नाही हे तपासण्याची जबाबदारी या कार्यालयाकडे असेल.

- उपाययोजना, अभियान, प्रकल्प अंमलबजावणीच्या नियमित अहवालांचे परिक्षण, समीक्षण आणि विश्लेषण करणे. अहवाल विविध खात्यांतील डीएमओ (Delivery Management Office) आणि मुख्यमंत्री कार्यालयाला सादर करणे.
- अंमलबजावणीतील अडचणींबाबत धोरणात्मक निर्णय घेणे व या अडचणी संदर्भात सल्ला देणे.
- अभियान, उपाययोजना अंमलबजावणी अहवाल नियमितपणे प्रसिद्ध करणे.

**इ) अंमलबजावणी कार्यालय (डिलीव्हरी मॅनेजमेंट ऑफिस)**

- **जलयुक्त शिवार अभियान** अंतर्गतजलसंधारण व इतर विभागात अंमलबजावणी कार्यालय (डिलीव्हरी मॅनेजमेंट ऑफिस) असेल. या कार्यालयामध्ये संबंधित खात्याच्या सचिवांच्या आदेशाद्वारे नियुक्त केलेला एक नोडल अधिकारी कार्यरत असेल.
- मुख्यमंत्री ट्रान्सफॉर्मेशन कार्यालयाकडून प्राप्त झालेल्य अहवालावर अभ्यास करुन तो आढाव्यासाठी संबंधित मंत्री महोदयांकडे पाठविणे आणि मंत्री महोदयांच्या टिपणीसह सुधारित अहवाल मुख्यमंत्री ट्रान्सफॉर्मेशन कार्यालयास सादर करण्याची जबाबदारी या कार्यालयाची राहील.
- विभागाशी संबंधित उपाययोजना किंवा प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये, समस्या दूर करण्याची जबाबदारी सदर कार्यालय मंत्री महोदय तसेच मुख्यमंत्री ट्रान्सफॉर्मेशन ऑफिसच्या मार्गदर्शनाखाली पार पडेल.

**ई) ट्रान्सफॉर्मेशन समिती**

- या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष मा. मुख्यमंत्री असतील. या समितीत संबंधित विभागाचे मंत्री व संबंधित विभागांच्या सचिवांचा व मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयाचा समावेश असेल.
- इतर सदस्यांमध्ये मुख्यमंत्र्यांचे कार्यालय, प्राधान्याने निवडलेल्या क्षेत्राशी संबंधित महत्वाच्या खात्यांचे मंत्री व सचिव यांचा समावेश असेल.
- अभियान, प्रकल्प, उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी पूरक धोरणात्मक नियम, नियमावली आखण्याची जबाबदारी या समितीवर राहील. मुख्यमंत्री ट्रान्सफॉर्मेशन ऑफिस कडून आलेल्या अहवालांचे परीक्षण करुन रखडलेल्या, खोळंबलेल्या प्रकल्पांचा आढावा घेऊन पुढील उपाययोजनेबाबत निर्णय ही समिती घेईल.

**२४. कार्यक्रमाचे मूल्यमापन :-**

या अभियानातील योजना सुरू असताना मूल्यमापन(Concurrent Evaluation) करण्यात येईल. त्याकरिता जिल्हयांतर्गत पथक तयार करुन इतर जिल्हयांचे मूल्यमापन करावे. तसेच

कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेली कामे पूर्ण झाल्यानंतर कार्यक्रमाचे त्रयस्थ संस्थेकडून मूल्यमापन करण्यात यावे.

**२५. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत पूर्ण केलेल्या कामांची नोंदसंबंधितांचे गोपनीय अहवालात घेणेत यावी.**

सदर शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ग्राम विकास विभाग, जलसंपदा विभाग, कृषि विभाग, नियोजन विभागव वित्त विभाग यांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४१२०६१०१५०६८४२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपालयांच्या आदेशानुसार व नावाने.

Prabhakar K Deshmukh

Digitally signed by Prabhakar K Deshmukh
DN: c=IN, o=All India Service, ou=Secretary, postalCode=411007, st=Maharashtra, cn=Prabhakar K Deshmukh
Date: 2014.12.11 11:50:20 +05'30'

**(प्रभाकर देशमुख)**
सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/ विधान परिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानसभा/ विधान परिषद व संसद सदस्य.
६. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
७. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
८. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
९. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई.
११. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन), मंत्रालय, मुंबई.
१२. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे-४११ ००१.

## परिशिष्ट - ब

### शासन निर्णय क्रमांकः जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ , दिनांक ५ डिसेंबर,२०१४

### अभियानांतर्गत हाती घ्यावयाच्या कामांचा सवस्तिर तपशिल

**१) पाणलोट विकासाची कामे :-**

Watershed

एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम व विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत मंजुर पाणलोटातील कंपार्टमेंट बंडींग / ढाळीची बांध बंदिस्ती, शेततळी, माती नालाबांध आणि सलग समतल चर कामे प्राधान्याने पूर्ण करावीत.

**२)** साखळी सिमेंट काँक्रीट नालाबंधाऱ्यांची कामे नाला खोलीकरण / रुंदीकरणासह करणे.

**३) जुन्या जलसंरचनांचे पुनर्जीवन करणे:-**

Revival of old assets

राज्यात विविध योजनांच्या निधीतून सिमेंट नालाबांध, कोल्हापूर टाईप बंधारा / साठवण बंधारा, पाझर तलाव, गाव तलाव आणि बोडी इत्यादी जलसंरचना निर्माण केलेल्या आहेत. सदरच्या जलसंरचनांमध्ये गाळ साठल्यामुळे, बांधांची फूटतूट झाल्यामुळे, गेट खराब झाल्यामुळे, सांडव्याची झीज झाल्यामुळे आणि भरावातून पाण्याची गळती होत असल्यामुळे पडणाऱ्या पावसाचे पाणी न साठता वाहून जात आहे. त्यामुळे ज्या उद्देशाने ही कामे केली त्याचा उद्देश सफल होत नाही म्हणून जलयुक्त गाव अभियाना मध्ये गावातील उपरोक्त नमूद केलेली सर्व पाणीसाठवणकरणाऱ्या संरचनांची दुरुस्ती / पुनर्जिवन करणे यासाठी खालील प्रमाणे कामे घ्यावीत.

- अस्तित्वात असलेल्या संरचनांची किरकोळ दुरुस्ती
- मुख्य बांधापासून बर्म सोडून नालाखोलीकरण व रुंदीकरण करणे.
- पाणलोटांच्या अपधाव क्षेत्रात खोल सलग समतल चर, वृक्षलाग वड व ओघळ नियंत्रणाची कामे करणे.
- मोठया मध्यम प्रकल्प सिंचन सुविधा व पाणी वापर संस्था सक्षम व कार्यान्वित करणे

**४)** अस्तित्वातील लघु पाटबंधारे संरचनांची (केटी वेअर /साठवण बंधारा) दुरुस्ती करणे.

राज्यामध्ये लघु पाटबंधारे कामाच्या अनेक योजना पूर्ण झाल्याअसून त्यांची सिंचन क्षमता पूर्ण क्षमतेने वापर होत नाही किंबहुना या संरचना कार्यरत नाहीत त्यामुळे त्यांची सिंचन क्षमता कमी झालेली आहे.

अस्तित्वातील लघु पाटबंधारे संरचनांची सिंचन क्षमता कमी होण्याची कारणे सर्वसाधारणपणे खालील प्रमाणे दिसून येत आहेत.

१) लोखंडी गेट चोरीस जाणे किंवा खराब होणे.

२) दगडी बांधकामामध्ये कामे केलेली असल्यामुळे मुख्य भिंतीतून आणि सांडव्यातून पाणी पाझरणे.

३) पाझर तलाव / ल.पा.तलाव / साठवण तलाव यांचे काम तांत्रिकदृष्ट्या व्यवस्थित न होणे.

४) कॅनॉलची फूट तूट होणे.

५) पूर्व विदर्भामध्ये ३०० ते ३५० वर्षापुर्वी माजी माल गुजरी तलाव मोठया प्रमाणात बांधलेले असून नैसर्गिक कारणामुळे त्यांची साठवण क्षमता कमी होऊन कालबाहय झालेले आहेत. या सर्व संरचनांची उपयोगिता वाढविण्यासाठी त्यांची दुरुस्ती जलयुक्त शिवार अभियानांतर्गत हाती घेण्यात यावी.

**लघु पाटबंधारे कामांची उपयोगिता वाढ विण्यासाठी करावयाची कार्यवाही:-**

१. सर्व लघु पाटबंधारे कामे नकाशावर आरेखन करणे.
२. सर्व लघु पाटबंधारे कामांची पहाणी उप अभियंता दर्जाच्या अधिका-याकडून करुन घेणे.
३. दुरुस्त करावयाच्या कामांचे फोटोग्राफ्स / व्हीडीओ शुटींग करणे.
४. दुरुस्त करावयाच्या कामांच्या बाबी निश्चित करणे.
५. दुरुस्तीसाठी हाती घ्यावयाच्या कामांची अंदाजपत्रके तयार करणे.
६. प्राधान्य क्रमानुसार लघु पाटबंधारे कामांची वर्गवारी करणे.
   अ वर्गवारी- १०० हेक्टर पेक्षा जास्त
   ब वर्गवारी - २५ ते १०० हेक्टर
   क वर्गवारी - २५ हेक्टर पर्यंत
७. दुरुस्तीची कामे अशासकीय संस्था, संबंधित लाभार्थी गट आणि यंत्रणेचे तांत्रिक कर्मचारी यांचे पर्यवेक्षणाखाली करणे.
८. दुरुस्ती केलेल्या लघु पाटबंधारे योजनांचा वापर व्यवस्थित होणेसाठी अशासकीय संस्था आणि गावातील संबंधित शेतकरी गटांस सामावून घ्यावे.

**५) पाझर तलाव, लघू सिंचन तलाव दुरुस्ती, नुतनीकरण व क्षमता पुर्नस्थापित करणे (RRR)**

**६) पाझरतलाव / गाव तलाव / साठवण तलाव / शिवकालीन तलाव / ब्रिटीश कालीन तलाव / निजामकालीन तलाव / माती नाला बांधातील गाळ काढणे. सदर गाळ काढण्याची कामे महात्मा फुले जल व भूमी अभियानाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करावीत.**

**७) मध्यम व मोठया प्रकल्पांची सिंचन क्षमतेनुसार प्रत्यक्ष वापर होण्यासाठी उपायायोजना करणे.**

**८) ओढा / नाले जोड प्रकल्प**

**९) विहीर / बोअरवेल पुनर्भरण कामे**

**१०) उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर :-**

शेतीसाठी सिंचनाच्या पाण्याचे व्यवस्थापन अतिशय महत्वाचे आहे. उपलब्ध पाणी स्त्रोतांचा व सुधारित तंत्रज्ञानाचा उपयोग करुन जमिनीची प्रत खराब न करता पिकाची उत्पादकता वाढविणेसाठी अवर्षण प्रवण भागात / कोरडवाहू क्षेत्रात सुक्ष्म सिंचना शिवाय पर्याय नाही. राज्यातील एकूण क्षेत्रापैकी ११.७७ लाख हेक्टर क्षेत्रावर ठिबक सिंचन संचाचा वापर करणेत आला आहे. त्यापैकी १.८६ लाख हेक्टर ऊसाचे क्षेत्र ठिबक सिंचनाखाली आहे. ही आकडेवारी बघता उपलब्ध पाण्याचा वापर बागायती पिके जसे ऊस, केळी यासाठी ठिबक

सिंचनाद्वारे करण्यास मोठा वाव आहे. जलयुक्त गाव अभियानांतर्गत उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर होणेकरिता खालील उपाययोजनांची अंमलबजावणी करणेत यावी.

- तुषार व ठिबक सिंचनाचा वापर गावातील सर्व पिकांसाठी करणे.
- गावात पाणी उपलब्धतेनुसार पीक रचना निश्चित करणे.
- ऊस, द्राक्ष, केळी व सर्व बारमाही पिकांसाठी ठिबक सिंचन बंधनकारक करणे.
- पाणी वापर संस्था / समुहाची व्याप्ती ४० ते ५० हेक्टरच्या मर्यादेत करणे.
- योजनेची देखभाल व दुरुस्ती हेड पर्यंत शासकीय यंत्रणेमार्फत व हेडच्या खाली लाभधारकाने / पाणी वापर समुहाकडून करणे.
- प्रति ५० हेक्टर सिंचन क्षेत्रासाठी समूह स्तरावर किमान १ जलरक्षक नेमणे.
- कार्यक्षम पाणी वापरा संदर्भातील प्रात्याक्षिकांचे आयोजन करणे.

**११) पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे.**

**१२) पाणी वापर संस्था बळकट करणे**

## परिशिष्ट- क

## शासन निर्णय क्रमांक : जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ , दिनांक ५ डिसेंबर,२०१४

## जलयुक्त शिवार अभियानांचा आराखडा गाव / तालुका/ जिल्हानिहाय तयार करणे

१) अस्तित्वात / मंजूर असलेल्या योजनांतर्गत जलसंधारणाची कामे प्राधान्याने पूर्ण करणे

| अ. क्र. | कामाचे प्रकार | कामे संख्या/ हेक्टर | उपलब्ध निधी (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | पाणलोट विकासाची कामे | | |
| २ | साखळी सिमेंट काँक्रीट नाला बंधाऱ्यांची कामे नालाखोलीकरण / रुंदीकरणासह करणे. | | |
| ३ | जुन्या जलसंरचनांचे पुनर्जिवन करणे. | | |
| ४ | अस्तित्वातील लघु पाटबंधारे संरचनांची (केटी वेअर /साठवण बंधारा) दुरुस्ती करणे | | |
| ५ | पाझर तलाव, लघू सिंचन तलाव दुरुस्ती, नुतनीकरण व क्षमता पुर्नस्थापित करणे (RRR) | | |
| ६ | पाझर तलाव / गाव तलाव / साठवण तलाव /शि वकालीन तलाव / ब्रिटीशकालीन तलाव / निजामकालीन तलाव / माती नालाबांधातील गाळ काढणे. | | |
| ७ | ओढा / नाले जोड प्रकल्प राबविणे | | |
| ८ | विहीर / बोअरवेल पुनर्भरण कामे | | |
| ९ | उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर | | |
| १० | पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे | | |

२) नव्याने हाती घ्यावयाची कामे :-

| अ. क्र. | कामाचे प्रकार | कामे संख्या/ हेक्टर | आवश्यक निधी (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | पाणलोट विकासाची कामे | | |
| २ | साखळी सिमेंट काँक्रीट नाला बंधा-यांची कामे नालाखोलीकरण / रुंदीकरणासह करणे. | | |
| ३ | जुन्या जलसंरचनांचे पुनर्जिवन करणे | | |
| ४ | अस्तित्वातील लघु पाटबंधारे संरचनांची (केटी वेअर /साठवण बंधारा) दुरुस्ती करणे | | |
| ५ | पाझर तलाव, लघू सिंचन तलाव दुरुस्ती, | | |

| अ. क्र. | कामाचे प्रकार | कामे संख्या/ हेक्टर | आवश्यक निधी (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| | नुतनीकरण व क्षमता पुर्नस्थापित करणे (RRR) | | |
| ६ | पाझर तलाव / गाव तलाव / साठवण तलाव / शिवकालीन तलाव / ब्रिटीशकालीन तलाव / निजामकालीन तलाव / माती नालाबांधातील गाळ काढणे. | | |
| ७ | ओढा / नाले जोड प्रकल्प राबविणे | | |
| ८ | विहीर / बोअर वेल पुनर्भरण कामे | | |
| ९ | उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर | | |
| १० | पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे | | |

३) अस्तित्वातील जलस्त्रोतांची दुरुस्ती व बळकटीकरण करणे, गाळ काढणे :-

| अ. क्र. | कामाचे प्रकार | कामे संख्या/ हेक्टर | उपलब्ध निधी /आवश्यक निधी (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| १ | अस्तित्वातील लघु पाटबंधारे संरचनांची (केटी वेअर /साठवण बंधारा) दुरुस्ती करणे | | |
| २ | पाझर तलाव, लघू सिंचन तलाव दुरुस्ती, नुतनीकरण व क्षमता पुर्नस्थापित करणे (RRR) | | |
| ३ | पाझर तलाव / गाव तलाव / साठवण तलाव / शिवकालीन तलाव / ब्रिटीशकालीन तलाव / निजामकालीन तलाव / माती नालाबांधातील गाळ काढणे. | | |
| ४ | ओढा / नालेजोड प्रकल्प राबविणे | | |
| ५ | विहीर / बोअर वेल पुनर्भरण कामे | | |
| ६ | उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर | | |
| ७ | पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे | | |

## परिशिष्ट - ड

**शासन निर्णय क्रमांक : जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ , दिनांक ५ डिसेंबर,२०१४**

**पाण्याचा ताळेबंद तयार करण्यासाठी खालील ठळकबाबी विचारात घेणे आवश्यक आहेत.:-**

- पाणलोट क्षेत्रामध्ये प्रत्यक्षात पडणारा पाऊस.
- पावसाचा निव्वळ वाहून जाणारा भाग.
- पाणलोटातील एकूण पाण्याची उपलब्धता.
- गावासाठी नेमकी पाण्याची गरज.
  अ) पिण्यासाठी आणि ब) सिंचनासाठी
- वाहूनजाणाऱ्या पाण्यामधून आपण किती पाणी अडविले आहे आणि अजून किती पाणी अडवू शकतो, याच बरोबर हे पाणी कोणकोणत्या उपचार पध्दतीने व किती पाणी अडविलेले आहे आणि संभाव्य कितीपाणी अडविणे आवश्यक आहे हे ठरवावे.
- नवीन घ्यावयाचे उपचार प्राधान्यक्रम - गावातील पाण्याची गरजभागविणेसाठी गावामध्ये अस्तित्वात असलेल्या उपचारांशिवाय आणखी नव्याने काही उपचार हाती घेण्याची आवश्यकता असल्यास ते खालील प्राधान्यक्रमाने पूर्ण करण्यात यावेत.

  १) सलग समतल चर / खोल सलग समतल चर, २) शेततळी, ३) गॅबियन बंधारे, ४) सिमेंट बंधारे, ५) नवीन के.टी. वेअर / पाझर तलाव / ल.पा. तलाव / गाव तलाव, ६) नाले / ओढा जोडकामे, ७) वनीकरण / कुरण विकास, ८) विहीर पुनर्भरण.